# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायकांळ)

जा.क्र. ७८६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३०/११/२०१६

**१) एसीबी भंडारा यांची कारवाई :–**

दिनांक २९/११/२०१६ रोजी १९.२५ वा. यातील आरोपीने आपले पदाचा स्वत:चे आर्थीक लाभाकरीता वाम व भ्रष्ट मार्गाचा गैरवापर करून तक्रारदार सुधीर रामटेके धंदा सेवानिवृत्त वाहक रा. शांती नगर भंडारा यांनी सेवानिवृत्त झाल्या नंतर त्यांचे जमा असलेल्या २९३ दिवसाच्या सुट्टीचे बिल काढुन देण्याकरीता १०,०००/–रु. ची लाचेची मागणी करुन सापळा कारवाही दरम्यान १०,०००/–रु. ची लाच रक्कम स्विकारतांनी मिळुन आल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ७,१३,(१) ,(ड) १३,(२) ला.प्र.का. १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. पारधी एसीबी भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) दारूडया वाहन चालकावर कारवाई. :–**

दिनांक २९/११/०१६ चे १७.०० वा. दर. यातील आरोपीने आपले ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूचे नशेत कारधा पवनी टोल नाका येथे चालवितांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. मते पो.स्टे. कारधा यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कारधा येथे कलम १८५(१) मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**३) दारूडया वाहन चालकावर कारवाई. :–**

दिनांक २९/११/०१६ चे १७.३५ वा. दर. यातील आरोपीने आपले ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूचे नशेत जिल्हा परिषद चौक भंडारा येथे चालवितांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. बडवाईक वा.नि.शा भंडारा यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. भंडारा येथे कलम १८५(१) मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. घरडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिनाक. २६/११/२०१६ रोजी ११.०० वा. दर. यातील मृतक गुलाब रामा मेश्राम वय ४५ वर्ष, रा. चिचाळ हा आपल्या गावी जास्त प्रमाणात दारु पिऊन खाली पडल्याने त्यास औषधोपचारा करीता सा. रु. भंडारा येथे नातेवाहीकांनी भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जाफौ चे कागदपत्र पोस्टेला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. कठाणे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. गिन्हेपुंजे पो. स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.